गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रिया
संदर्भात समिती गठीत करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण -२०१९/३३०/प्र.क्र.२०५/कु.क.

१० वा मजला, बी विंग, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, लो.टि. मार्ग, मुंबई- ४०० ००१
तारीखः २६ जुन,२०१९

**वाचा -**

**१) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय यांचे क्रमांकः राकुकका/ Hysterectomy समिती/ १७-२१/१९,दि.२०.६.२०१९**

**प्रस्तावना -**

बीड जिल्हयातील खाजगी रुग्णालयात उस तोडणीला जाणाऱ्या महिलांमध्ये मोठया प्रमाणावर गर्भाशय काढून टाकण्याच्या झालेल्या शस्त्रक्रिया संदर्भात दि.१८.६.२०१९ रोजी विधानपरिषदेत तारांकित प्रश्न क्र. ४६५०० वर चर्चा झाली. या चर्चे दरम्यान मा. मंत्री महोदय यांनी गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रिया संदर्भात (Hysterectomy) राज्य स्तरावर महिला आमदार व विशेषज्ञांची समिती गठीत करण्याचे आश्वासन दिले. सदर आश्वासनाच्या अनुषंगाने समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय -**

बीड जिल्हयातील खाजगी रुग्णालयात गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियासंदर्भात (Hysterectomy) तपासणी करण्यासाठी राज्यस्तरावर खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव व पदनाम | नियुक्तीचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | डॉ.(श्रीमती) निलम गोऱ्हे,वि.प.स. | अध्यक्ष |
| २ | श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. | सदस्य |
| ३ | श्रीमती मनिषा कायंदे, वि.प.स. | सदस्य |
| ४ | प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| ५ | प्राध्यापक व विभाग प्रमुख (स्त्री रोग व प्रसुतीशास्त्र), बी.जे. वैद्यकिय महाविद्यालय, पुणे | सदस्य |
| ६ | डॉ. एम.व्ही. कर्नाटकी, युनिसेफ सल्लागार | सदस्य |
| ७ | संचालक, आरोग्य सेवा (२) ,पुणे | सदस्य सचिव |

## समितीची कार्यकक्षा -

१. मागील ३ वर्षांत बीड जिल्हयामध्ये खाजगी रुग्णालयात गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियांबाबात (Hysterectomy) तपासणी करणे.
२. या शस्त्रक्रिया केलेल्या महिलांच्या संदर्भाने तांत्रिक अभ्यास करणे. यासाठी खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांनी त्यांच्या स्तरावर उपलब्ध असलेले रेकॉर्ड आणि प्रत्यक्षात काही महिलांच्या मुलाखती घेऊन त्यांनी दिलेली माहिती याची पडताळणी करणे.
३. रुग्णालयामार्फत अनावश्यक शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत किंवा कसे या बाबतीत अभ्यास करणे.
४. अशा प्रकारच्या शस्त्रक्रियांवर प्रतिबंध घालण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

## समितीचा कालावधी -

सदर समिती शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून २ महिन्यांत शासनास अहवाल सादर करेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२५१७१५०२०५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ujwala Arun Ransing

Digitally signed by Ujwala Arun Ransing
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7788b3b31e2d9269bcbfd9588a6ee4771341780133d295a56dd4ef476977773, serialNumber=3b8f98f1c182bf458a4deee399a7241b5044aeb09c097bc6d28b58709fe8ef0d, cn=Ujwala Arun Ransing
Date: 2019.06.26 10:53:39 +05'30'

**(उज्वला अ. रणसिंग)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, मुंबई.
२. राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, मुंबई.
३. डॉ.(श्रीमती) निलम गोऱ्हे, वि.प.स.
४. श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

५. श्रीमती मनिषा कायंदे, वि.प.स.

६. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई.

७. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

८. संचालक, आरोग्य सेवा (२),पुणे.

९. प्राध्यापक व विभाग प्रमुख (स्त्री रोग व प्रसुतीशास्त्र), बी.जे. वैद्यकिय महाविद्यालय, पुणे

१०.डॉ. एम.व्ही. कर्नाटकी, युनिसेफ सल्लागार

११. प्रधान सचिव, विधानपरिषद , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

१२.अभिलेख कक्ष, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

१३.निवडनस्ती/कु.क.